# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 30 ) 15 th January, 2005 ( No : 01

# A G E N D A

**of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS'ASSOCIATION to be held at 12.00 noon on *SUNDAY, the***

***30 th January, 2005 at***

**New Arts, Commerce & Science College, Batchelor Road, Murarka Layout, WARDHA**

Agenda of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association to be held at 12.00 noon on Sunday, the 30 th January, 2005 New Arts, Commerce & Science College, Batchelor Road, Murarka Layout, Wardha is as follows :-

## ITEM NO. 364 :
## *CONFIRMATION OF MINUTES :*

TO CONFIRM the minutes of the General Body meeting of Nagpur University Teachers' Association held at 12.00 noon on Sunday, the 9th May, 2004 at Smt. Kesharbai Lahoti Mahavidyalaya, Amravati.

*Notes :- 1) Copy of the minutes was Circulated on pages 73 to 75 of 2004 NUTA Bulletin.*

*2) Corrections, if any, were invited in the copy of the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association held at 12.00 noon on Sunday, the 9th May, 2004 at Smt. Kesharbai Lahoti Mahavidyalaya, Amravati, vide No.CIM/17 Dated 15th July, 2004 published on page 74 of 2004 NUTA Bulletin. No correction is received.*

## विषय क्रमांक ३६४ (अ) :
## *सुधा शंकर पराते यांच्या दुःखद निधनाबद्दल शोकप्रस्ताव*

प्रा. अविनाश एम.साहुरकर हे पुढील प्रस्ताव मांडतील :-

"यशवंत महाविद्यालय, सेलू जी.वर्धा येथील इतिहास विभाग प्रमुख प्रा.सौ. सुधा शंकर पराते (कु.नंदनवार) यांचे दिनांक १ डिसेंबर २००४ ला दुःखद निधन झाले. प्रा.सौ. पराते ह्या नुटाच्या आजीव सदस्य होत्या. संघटनेच्या कार्यामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असायचा. विशेषतः महिलांच्या प्रश्नाबाबत त्या सतत जागरूक राहायच्या. श्री. पराते यांचेवर व त्यांच्या कुटुंबीयांवर ओढवलेल्या ह्या दुःखद प्रसंगामध्ये आम्ही सहभागी आहोत तसेच त्यांच्या कुटूंबियांवर ओढवलेले दुःख सहन करण्याची शक्ती ईश्वर त्यांना प्रदान करो. प्रा.सौ. सुधाताई पराते यांना श्रद्धांजली अर्पण करीत आहोत"

## विषय क्रमांक ३६५ :
## *प्रा.बी.टी.देशमुख यांचे अभिनंदन*

कार्यकारी मंडळाच्या वतीने सचिव डॉ.एकनाथ कठाळे हे पुढील प्रस्ताव मांडतील :-

अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातील नुटाचे अधिकृत उमेदवार प्रा.बी.टी.देशमुख हे लागोपाठ पाचव्या वेळी महाराष्ट्र विधानपरिषदेवर भारतीय जनता पक्षाच्या निकटतम प्रतिस्पर्धी उमेदवाराचा १२,१४१ मतांनी पराभव करुन पहिल्याच फेरीत पसंतीच्या प्रथम क्रमांकाच्या मतांनी निवडून आले. त्यांच्या या निवडणूकीने विधानपरिषदेवर लागोपाठ सातत्याने पाचव्यावेळी पदवीधर मतदार संघातून निवडून जाण्याचा बहुमान त्यांना मिळाला आहे. भारतातील विधानपरिषदांच्या इतिहासात हा एक विक्रमी सन्मान आहे. आमच्या प्रतिनिधीच्या या यशाने नुटाचे सर्व सदस्य आणि महाराष्ट्रातील तमाम शिक्षकांना एक प्रकारचा गौरव प्राप्त झाला आहे. **ही सभा या गौरवाचा अतिशय आनंदाने आणि अभिमानाने स्वीकार करीत आहे.**

विधानपरिषद निवडणुकीसाठी नामांकन अर्ज दाखल करतांना आपल्या मालमत्तांची त्यांनी सादर केलेली यादी श्री. बी.टी.देशमुखांप्रमाणेच एक आदर्श निर्माण करणारी ठरली. ही यादी केवळ निवडणूक अधिकाऱ्यापुरतीच मर्यादित ठेवण्यात आलेली नव्हती तर ती मतदारांपर्यंत पोहचविण्यात आली होती. अशाप्रकारे आपल्या मालमत्तांची विस्तृत माहिती व उत्पन्नाचे स्त्रोत मतदारांपर्यंत पोहचविणारे ते विदर्भातील पहिले प्रतिनिधी ठरले आहेत. त्यांच्या या कृतीने लोकप्रतिनिधींचे आर्थिक व्यवहार आणि एकूण जीवनच पारदर्शक असले पाहिजे या प्रमेयाचा येणारा प्रत्यक्ष प्रत्यय निश्चितच

---

**NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**

**MEETING NOTICE : 2**

**Date : 15.01. 2005**

From
**Dr.E.H.Kathale,**
Secretary, **NUTA,**
N-162, Reshim Bagh, Nagpur-440 009.

To,
**All the members**
of the Nagpur University Teachers' Association

Dear members,

I have the honour to inform you that in exercise of the powers conferred on it by Article VIII of the Constitution of NUTA, the Executive Committee has decided to have the meeting of General Body at **12.00 Noon** on the date and at the place mentioned below.

2. Agenda of the General Body meeting is printed in this NUTA Bulletin. If you propose to suggest any amendments to any of the proposals/ Resolutions included in the Agenda, you may send it to me within a period of one week from the date of the posting of this Bulletin. It will not be possible for the amendments received after the due date to be included in the additional agenda. Please send one copy of your amendment to Prof. B.T.Deshmukh, President, NUTA, 3, Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati-444 604.

3. Rules for proposing amendments to the proposals/resolutions are printed on page 97 of 1977 NUTA Bulletin. You are requested to kindly make it convenient to attend the meeting.

Yours faithfully,
Sd/- **Dr. E.H.Kathale**
Secretary, NUTA

***Date and Place of the meeting***

**at 12.00 Noon on, Sunday, the**

***30 th January, 2005 at***

**New Arts, Commerce & Science College, Batchelor Road, Murarka Layout, WARDHA**

---

आनंददायक आहे. **प्रतिज्ञापत्राची प्रत आपणहून वाटणारा वारकरी होण्याचा मान मिळवणारा आमचा नेता सातत्याने उत्तम चारित्र्य आणि मूल्य जपणारा आहे याबद्दल या सभेला अतीव अभिमान वाटतो.**

सन १९८० पासून तर सन २००४ पर्यंत २४ वर्षे आमदार राहिलेल्या प्रा.बी.टी.देशमुख यांनी या २४ वर्षांच्या काळात संपादन केलेल्या स्थावर मालमत्तांची संख्या केवळ २ असून त्यांची मूळ खरेदी किंमत म्हणजेच या मालमत्तांच्या संपादनासाठी त्यांनी केलेला खर्च रुपये ३,८०,२४२ (तीन लक्ष ऐंशी हजार दोनशे बेचाळीस रुपये फक्त) आहे. सत्यप्रतिज्ञेवर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये ही गोष्ट त्यांनी नमूद केली आहे. विशेष असे की, या दोन मालमत्ता खरेदी करण्यासाठीचा हा निधी (रुपये ३,८०,२४२) उभा करतांना सुद्धा (१) आमदार होण्यापूर्वी घेतलेली एक मालमत्ता (प्लॉट) विकून त्यांना रुपये ६२४०० उभे करावे लागले. (२) आमदार होण्यापूर्वी काढलेल्या आयुर्विमा महामंडळाच्या तीन पॉलिसीज अकाली मोडून रुपये २० हजार उभे करावे लागले. (३) घरावर व शेतावर दीड लक्ष रुपयांचे कर्ज काढावे लागले. (४) ५० हजार रुपये उसनवार घ्यावे लागले. या दीड लक्ष रुपयांच्या कर्जाची व ५० हजार रुपयांच्या उसनवारीची अशी एकूण २ लक्ष रुपयांची परतफेडसुद्धा त्यांना त्यांच्या "पेन्शनरी बेनिफिटस्" मधून करावी लागली. त्यांनी स्थावर मालमत्तेबाबत "नविन कोणतीही स्थावर मालमत्ता घेण्याचा आता यापुढे विचार सुद्धा करु नये असा निर्णय घेतला व १९८६ मध्ये घेतलेला हा निर्णय पुढची १८ वर्षे काटेकोरपणे पाळला....... लोकप्रतिनिधीचा दिवस सुद्धा २४ तासाचाच असतो आणि त्याचा ताससुद्धा ६० मिनिटाचाच असतो. लोकप्रतिनिधीने स्वतःच्या खाजगी प्रकल्पाकडे जास्त वेळ देतो म्हटले की त्याचा प्रतिनिधी म्हणून करावयाच्या कामासाठीचा तेवढा वेळ कमी होतो." या त्यांनी स्वतः केलेल्या प्रतिपादनातून विचारपूर्वक ठाम निर्णय घेणे व घेतलेल्या निर्णयाची तेवढ्याच ठामपणे अम्मलबजावणी करणे एवढ्याच गुणांचा प्रत्यय येतो असे नव्हे तर आपल्या २४ वर्षाच्या विधानपरिषद कारकीर्दिचे 'सोने' करणारा त्यांचा उपरोक्त विचार ही सुद्धा लोकप्रतिनिधीची एक मोठी मालमत्ता असते हा त्यांच्या वर्तनातून डोकावणारा स्थावर विचार हा लोकप्रतिनिधींना विचार करायला लावणारा विचार आहे असे या सभागृहाला वाटते.

एकूण २४ वर्षाच्या कारकिर्दीत सार्वजनिक महत्वाचे पाच हजारांपेक्षा जास्त प्रश्न आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने विधानपरिषदेत मांडणे व त्यातील अनेक प्रश्नांना न्याय मिळवून जनसामान्यांची समर्पित भावनेने सेवा करतांना आमच्या प्रतिनिधीने, सभागृहातील कामाचा दाखविलेला "धडाका" पाहून मन समाधानाने भरून येते. भारतीय संविधानाच्या कलम २०४ अन्वये "विनियोजन विधेयकाला सुधारणा सूचविण्याचा अधिकार आमच्या सभागृहाला नाही. पण कलम १९८ अन्वये अशा विधेयकाबाबत शिफारस करण्याचा अधिकार आमच्या सभागृहाला निश्चितच आहे." असा आग्रह धरणारा व सभागृहासमोर त्या शिफारसी बाबतचा ठराव मांडणारा, सांवैधानिक इतिहास घडविणारा सदस्य हा आमचा प्रतिनिधी आहे ही खचितच अभिमानास्पद बाब आहे. विधानपरिषदेत अशा शिफारसीचा मसुदा मांडल्या गेला, तो सभागृहात एकमताने स्वीकारला गेला, त्यासाठी विधानसभेचे एक दिवसाचे खास अधिवेशन बोलवावे लागले, विधानसभेने ती शिफारस एकमताने मान्य केली, भारतीय संविधानाच्या इतिहासात ती गोष्ट प्रथम घडलेली होती व या घटनाक्रमाचे नेतृत्त्व आमचा प्रतिनिधी करीत होता. हे सारे कशासाठी होते? मा. सभापतींच्या शब्दातच सांगायचे तर "राज्यातील अनुशेषग्रस्त जो भाग आहे, त्यातील विकासाचा अनुशेष दूर व्हावा, कालबद्ध कार्यक्रमानुसार व्हावा, यासाठी जो काही निधी आहे, त्याचा कशा रीतीने विनियोग करावा हे सुचविणारी अशा प्रकारची ती शिफारस होती. मा. राज्यपालांनी काढलेल्या अध्यादेशाची अंमलबजावणी व्हावी एवढाच त्यामध्ये उद्देश होता." **सांवैधानिक इतिहास घडविणाऱ्या आमच्या या प्रतिनिधीबद्दल आम्हाला मनापासून आदर वाटतो.**

स्वशिक्षणासाठी स्वतःच्या परिश्रमातून अर्थार्जन करुन संपूर्ण शालेय व महाविद्यालयीन शिक्षणप्रवास पूर्ण करणे, विद्यार्थी दशेतच मेधावी वक्ता आणि वादविवादपटू म्हणून विधिमंडळातील कौशल्याची झालेली निर्मिती, विद्यार्थी दशेतच महाविद्यालयाच्या छात्रसंघाचे अध्यक्ष म्हणून प्राप्त केलेले लोकशाही प्रशिक्षण आणि हे सर्व करतांना एम.ए. राज्यशास्त्र परीक्षेत प्राप्त केलेले प्रथम क्रमांकाचे स्थान, आपल्या वक्तृत्वाने विद्यार्थ्यांपर्यंत राज्यशास्त्र

**SCHEDULE VIII** (Vide Rule 17 /1)
Trust Reg. No. F-1594

**C.R. Sagdeo & Co.** Chartered Accountants
"Prabha Niwas" Jail Road,Nagpur 440 022.Phone :524634

**NAME OF THE PUBLIC TRUST : NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**
Place : Nagpur -- Taluka : Nagpur -- District : Nagpur
**BALANCE SHEET AS AT : 31ST MARCH 2004**

| FUNDS & LIABILITIES | Rs. P. | Rs. P. |
|---|---|---|
| **1 TRUST FUND OR CORPUS** | | |
| **Life membership fee** | | |
| Balance as per Last B/S ... | 38,18,406.32 | |
| Adjustment during the year ... | 1,69,004.00 | 39,87,410.32 |
| **II OTHER EARMARKED FUND** | | |
| Depreciation Fund ... ... ... | | |
| Legal Aid fund ... ... ... | | |
| Sinking Fund ... ... ... | | |
| Reserve Fund ... ... ... | | |
| Any other (Silver Jubilee) Fund | | |
| (As per Schedule 'A') ... ... | | 30,36,385.75 |
| **III LOANS Secured or unsecured** | | |
| From Trustees ... ... ... | | |
| From Others ... ... ... | | |
| **IV LIABILITIES** | | |
| As per schedule 'B' ... ... | | 2,731.00 |
| For expenses ... ... ... | | |
| For advances ... ... ... | | |
| For rent/ other deposits ... | | |
| For Sundry credit balances ... | | |
| For Nuta Special Bulletin ... | | |
| **V INCOME AND EXPENDITURE ACCOUNT** | | |
| Balance as per Last B/S ... | (6,29,372.42) | |
| Less appropriation if any | (78,545.68) | |
| add/less :surplus/ deficit | | |
| as per I/E Account ... | | (7,07,918.10) |
| **TOTAL Rs.** | | **63,18,608.97** |

| PROPERTY & ASSETS | RS. P. | RS. P. |
|---|---|---|
| **I IMMOVABLE PROPERTIES** (As per Sch.C) | | 81,658.72 |
| **Fields** | | |
| Balance as per last B/S ... | | |
| Additions or deductions ... | | |
| **Buildings** | | |
| Balance as per last B/S ... | | |
| Additions or deduction Dep. | | |
| **Furniture and Fixtures** | | |
| Balance as per last B/S ... | | |
| Addition or deductions ... | | |
| Depreciation 10% ... ... | | |
| **II INVESTMENTS** | | |
| As Per Shedule 'D' ... ... | | 41,41,040.00 |
| **III LOANS & ADVANCES** | | |
| **A) Loans**:Secured/Unsecured | | |
| Loan Scholarship ... ... | | |
| Other Loans ... ... ... | | |
| **B) Advances** | | |
| To trustess ... ... ... | | |
| Deposit in Post Office ... | | |
| To employees ... ... ... | | |
| To contractors ... ... ... | | |
| To lawyers ... ... ... ... | | |
| To Other TDS ... ... ... | | 26,796.64 |
| (As per Sch 'E') | | |
| **IV INCOME OUTSTANDING** | | |
| House Rent ... ... ... ... | | |
| Nuta Spe. Bullutin Exp ... | | |
| Exp. during the year ... | | |
| Land Rent ... ... ... ... | | |
| Interest ... ... ... ... ... | | |
| Other Income ... ... ... | | |
| **V CASH AND BANK BALANCES** | | |
| (a) Cash in hand with Shri. | | |
| (b) As per Schedule 'F' ... | | 20,69,113.61 |
| **TOTAL Rs.** | | **63,18,608.97** |

The above Balance sheet to the best of my belief contains a true account of the Funds and libalities and assets of the trust

Trustee:
S/d. S.A.Tiwari
Trust Address : Nagpur
Date : 9th June 2004

**As per Our report of even date**
For C.R.SAGDEO & CO
Chartered Accountants
Sd/- Partner

विषयाचे ज्ञान लीलया पोचविणारा शिक्षक, सेवेच्या पहिल्याच वर्षात "भारतीय संविधान व स्वातंत्र्य आंदोलन" या ग्रंथाचे लेखन, नागपूर व अमरावती विद्यापीठाच्या विभिन्न प्राधिकारीणींवर कार्य करुन स्वयंकर्तृत्वाचा उमटविलेला ठसा, शिक्षकांच्या अनियमित सेवाशर्तीमध्ये खोलवर अध्ययन करुन आणलेला नियमितपणा, "नुटा" "एमफक्टो" आणि "आयफक्टो" या संघटनांमध्ये निष्ठेने केलेले कार्य, या संघटनांच्या वाटचालीत अखंडपणे दिलेले सक्रीय योगदान, प्रभावीपणे संसदीय आयुधांचा केलेला वापर पाहून "उत्कृष्ट संसदपटू" म्हणून प्राप्त झालेला बहुमान, कै. माधवराव लिमये स्मृती प्रित्यर्थ दिल्या गेलेल्या "कार्यक्षम आमदार" या पुरस्काराचे पहिले मानकरी, महाराष्ट्र विधानपरिषदेचे अस्थायी सभापती, विदर्भाच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व अनुशेषविषयक प्रश्नांची जाण असलेला लोकप्रतिनिधी, "महाराष्ट्रातील जलसिंचन अनुशेष क्ष-किरण परीक्षा" या पुस्तकातून अनुशेष प्रश्नांची केलेली विश्लेषणात्मक अभ्यासपूर्ण चर्चा, अनुशेष निर्मूलनार्थ स्थापीत "अनुशेष निर्मूलन मंच" या सर्वपक्षीय आमदारांच्या फोरमचे अध्यक्ष या नात्याने केलेले कार्य पाहता जीवनात प्राप्त झालेल्या संधीचा दूरदृष्टीने उपयोग करुन आपले आयुष्य लोककार्यार्थ वेचावे अशी जीवननिष्ठा ठेवणाऱ्या आमच्या प्रतिनिधीने पाचव्यांदा निवडून येवून सांसदिय जीवनातील उत्तम उंची गाठली याबद्दल आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. **आपले जीवितकार्य अधिक जोमाने पूर्ण करता यावे यासाठी ही सभा त्यांना मनापासून शुभेच्छा देत आहे.**

जीवननिष्ठा कायम ठेवून गेली २४ वर्षे जीवितकार्य या नात्याने संघटनांच्या आणि लोकांच्या जीवनातील कळीच्या प्रश्नांना आणि विशेषतः अनुशेषविषयक प्रश्नांना हात घालून त्यांच्या निराकरणासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांना त्यांच्या विजयाने लोकमान्यतेची पावती मिळालेली आहे. सातत्याने ही भूमिका कायम ठेवून संघटनेची त्यांनी शान वाढविली याबद्दल संघटनेला अतीव आनंद वाटतो. अनुशेष निर्मूलनाचा लढा ध्येयपूर्वक सुरू ठेवणारा प्रतिनिधी पुन्हा निवडून आल्याने याबाबतचा अन्याय दूर होण्याचा मार्ग प्रशस्त होईल अशी या सभागृहाची भावना आहे. त्यांच्या निवडून येण्याने त्यांची वाढलेली जबाबदारी लक्षात घेता त्यांच्या पाठीशी या कामात भक्कमपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त करण्यात येत आहे. **संघटनेला गौरवान्वित करणारा ऐतिहासिक विजय प्राप्त करुन देणाऱ्या आमच्या प्रतिनिधीचे, हे सभागृह मनःपूर्वक अभिनंदन करीत आहे.**

## विषय क्रमांक ३६६ :
## *श्री. डायगव्हाणे यांचे अभिनंदन*

कार्यकारी मंडळाच्या वतीने उपाध्यक्ष प्रा. अनिल ढगे हे पुढील प्रस्ताव मांडतील :-

नागपूर विभाग शिक्षक मतदार संघातून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे अधिकृत उमेदवार श्री. विश्वनाथ डायगव्हाणे हे लागोपाठ तिसऱ्या वेळी विजयी झाले आहेत. लागोपाठ तिसऱ्या वेळी विधानपरिषदेत निवडून जाणारे विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे ते पहिले प्रतिनिधी आहेत. ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## विषय क्रमांक ३६७
## प्रा.बी.टी.देशमुख व व्ही.यु.डायगव्हाणे यांचे अभिनंदन

प्रा.मनोहर बनसोड हे पुढील प्रस्ताव मांडतील :-

"अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातील 'नुटा'चे अधिकृत व विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे समर्थित उमेदवार प्रा.बी.टी.देशमुख यांनी पाचव्यांदा महाराष्ट्र विधानपरिषदेवर प्रचंड मताधिक्याने निवडून येवून भारतात एक ऐतिहासिक विजयी विक्रम घडविला. ही बाब संघटनेच्या जीवनातील केवळ आनंदाची नसून अभिमानाची व गौरवाची आहे. संघटनेचे वैभव आहे.

तसेच नागपूर विभाग शिक्षक मतदार संघातून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे अधिकृत व नुटाचे समर्थित उमेदवार श्री.विश्वनाथ डायगव्हाणे हे लागोपाठ तिसऱ्या वेळी विजयी झालेत. विधान परिषदेतील या दोन्ही आमदारांच्या कार्यकर्तृत्वाचा व उभय संघटनांच्या उत्तम बांधणीचा हा विजय आहे.

या दोन्ही आमदारांच्या विक्रमी विजयाबद्दल ही सभा आनंद व्यक्त करीत आहे. उभय आमदारांच्या मनःपूर्वक अभिनंदनाचा ठराव ही सभा सर्वानुमते पारित करीत आहे."

SCHEDULE IX (Vide Rule 17 /1)
Trust Reg. No. F-1594

**C.R. Sagdeo & Co Chartered Accountants**
"Prabha Niwas" Jail Road, Nagpur 440 022.
Phone : 524634

**NAME OF THE PUBLIC TRUST : NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**
Place : Nagpur * Taluka : Nagpur * : District Nagpur

**INCOME AND EXPENDITURE ACCOUNTS FOR THE YEAR ENDING ON 31st MARCH 2004**

| EXPENDITURE | RS. P. |
|---|---|
| **To Expenditure in respect of Properties** | |
| Rate, taxes, cesses Income Tax ... | |
| Repairs and maintenance ... ... | |
| Salaries ... ... ... ... ... ... ... | |
| Insurance ... ... ... ... ... ... | |
| Depreciation ... ... ... ... ... ... | 8,036.10 |
| **Other expenses** | |
| To Establishment expenses(As per.Sch 'G') | 1,16,827.00 |
| To Remuneration to trustees ... ... ... | |
| To Remuneration (in the case of a math) to the head of the math including ... ... his house hold expenditure, if any ... ... | |
| To Legal expenses ... ... ... ... ... | |
| To audit fee ... ... ... ... ... ... ... | 1,575.00 |
| **To amount Written of** | |
| (a) Bad debts ... ... ... ... ... | |
| (b) Loan Scholarship ... ... ... ... | |
| (c) Irrecoverable rents... ... ... ... | |
| (d) Other items... ... ... ... ... | |
| To Miscellaneous Expenses ... ... | |
| To Depreciation on Bldg | |
| To Depreciation on furn. | |
| To Depreciation on Computor ... ... ... | |
| To Depreciation on Air Condiotioner ... ... | |
| **To Expenditure on objects of the trust** | |
| (a) Religious ... ... ... ... ... ... ... | |
| (b) Educational NUTA | |
| Bulletin Expenses ... 3,46,087.00 | |
| Bulletin Postages Exp. 24,697.00 | 3,70,784.00 |
| (c) Medical Relief ... ... ... ... ... ... | |
| (d) Relief of Poverty ... ... ... ... ... | |
| (e) Other Charitable object ... ... ... | |
| Surplus Carried over to B/S ... ... | |
| **Total Rs.** | **4,97,222.10** |

| INCOME | RS. P. |
|---|---|
| **By House Rent Accrued/Realised** ... | |
| **By Agriculture Income** ... ... ... ... | |
| **By land Rent** Accrued/Realised ... ... | |
| **By Interst** Accrued /Realised | |
| On Securities ... ... ... ... ... | 2,47,922.35 |
| On Loans | |
| On Bank account (FDR & Savings) | 84,993.00 |
| **By Divident** on Units of U.T.I ... ... ... | 80,249.07 |
| **By Donation** in cash or Kind ... ... ... | |
| **By Grants** ... ... ... ... ... ... | |
| **By Income** from other sources ... ... | |
| Interest on Income Tax refund ... ... | |
| **By Profit** on sale of Investment ... | 5,512.00 |
| **By Transfers** from Reserve ... ... ... | |
| (U.T.I.M.I.P. 88 Maturity ... ... ... | |
| **By deficit** carried over to balance sheet ... | 78,545.68 |
| **Total Rs** | **4,97,222.10** |

**As per Our report of even date**
For C.R.SAGDEO & CO
Chartered Accountants
illegible/**Partner**

Trustee/Sd/-S.A.Tiwari
Trust Address : Nagpur
Date : 9th June 2004

## ITEM NO. 368 : *APPROVAL TO THE AUDITED STATEMENT.*

**To consider and approve** the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account of the Association for the year ended on 31st March, 2004.

***Notes*** : *(i) The copy of the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account of the Association for the said Financial year is circulated on page 02 & 03 of 2005 NUTA Bulletin.*

*(ii) The Audited Balance Sheet and Income and Expenditure Account will be placed before the General Body by Prof. S.A.Tiwari, Treasurer, on behalf of the Executive Committee.*

*(iii) If any honourable member has a querry, regarding the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account, he should make it, within a week from the date of posting of this Bulletin, to Prof. S.A.Tiwari, Treasurer, NUTA, 42, Shankar Nagar, Amravati-444 606, specifying the exact point on which he seeks information/clarification. A copy of the querry also be sent to Prof. B.T.Deshmukh, President, NUTA, 3, Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati-444 604.*

## ITEM NO. 369 : *STATEMENT ON FIXED SECURITIES POSITION :*

**To Note** the Statement no. 15 showing the position of the Fixed Securities of the Association as on 31st March, 2004.

***Note :*** *(i) Statement no.15 regarding the fixed securities of the Association as on 31st March, 2004, is circulated on page 08 of 2005 NUTA Bulletin.*

*(ii) The Statement showing the position of the Fixed Securities of the Association as on 31st March, 2004, will be placed before the General Body by Prof. S.A.Tiwari, Treasurer, on behalf of the Executive Committee.*

## विषय क्रमांक ३७०
## *सन १९९१ ते सन १९९९ या काळातील नेटसेटग्रस्तांची प्रकरणे व्यक्तिशः छाननीसाठी घेण्याचा विद्यापीठ अनुदान आयोगाचा निषेधार्ह निर्णय*

रविवार, दिनांक ९ जानेवारी २००५ रोजी मुंबई येथे झालेल्या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत "सन १९९१ ते सन १९९९ या काळातील नेटसेटग्रस्तांची प्रकरणे व्यक्तिशः छाननीसाठी घेण्याचा विद्यापीठ अनुदान आयोगाचा निषेधार्ह निर्णय" या विषयावर संमत करण्यात आलेला ठराव विचारात घेणे.

***नोट*** *:- हा ठराव २००५ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ६ ते ९ वर प्रसृत करण्यात आलेला आहे.*

## विषय क्रमांक ३७१ :
## *संघटनेच्या एकमताच्या निर्णयावर नुटाच्या जिल्हाध्यक्षांनी घेतलेली भूमिका*

कार्यकारी मंडळाच्या वतीने सचिव डॉ.एकनाथ कठाळे हे पुढील प्रस्ताव मांडतील :-

(१) नुटाचे सदस्य व अकोला जिल्हा युनीटचे अध्यक्ष डॉ.विठ्ठल वाघ यांनी अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर एक प्रतिनिधी निवडण्यासाठी नुकत्याच झालेल्या निवडणुकीमध्ये क्षुल्लक अशा वैयक्तिक कारणावरून संघटनेने एकमताने ठरविलेल्या भूमिकेच्या विरोधात भूमिका घेतली. स्वतःच्या नावानिशी त्यांनी दिनांक १४ नोव्हेंबर २००४ रोजीच्या 'देशोन्नती'च्या अंकामध्ये प्रसिद्ध केलेल्या लेखात हे वैयक्तिक व क्षुल्लक कारण त्यांनी स्वतःच पुढील शब्दात नमूद केले आहे. :-

''कुलगुरू पदासाठी बीटींच्या देखरेखीखाली जी पाच नावांची यादी तयार केली गेली होती त्यात माझही एक नाव होत. मी पतंग होऊन एक महिना तरी हवेतच तरंगत होतो; पण सुधीर पाटलांकरवी माझा पतंग कापून मला जमिनीवर आणले ते भाऊंनी.''

वस्तुतः महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम १२ उपकलम (१३) (इ) मध्ये ''एखादा इसम ''पोलीटीकल ॲक्टीव्हीटी''मध्ये भाग घेणारा असेल किंवा घेत असेल तर तो कुलगुरूपदी नेमला जावू शकत नाही, कुणी नेमला गेला असेल तर त्या कारणावरून त्याला काढून टाकता येईल.'' अशी स्पष्ट तरतूद आहे. ''पोलीटीकल ॲक्टीव्हीटी'' हा इंग्रजी शब्द असला तरी लोकसभेची निवडणूक ही ''पोलीटीकल ॲक्टीव्हीटी'' आहे ही गोष्ट लहान मुलाला सुद्धा समजण्यासारखी आहे. डॉ.विठ्ठल वाघ हे स्वतः कुलगुरू होण्याची इच्छा धारण करण्यापूर्वी लोकसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवार होते ही गोष्ट इतर कोणाला माहिती असेल किंवा नसेल पण ती विठ्ठल वाघ यांना निश्चितच माहिती होती. सेंट्रल वेअर हाऊसिंग कार्पोरेशनच्या अकोला येथील गोडाऊनमध्ये दिनांक २ मार्च १९९८ रोजी झालेल्या मतमोजणीचे जे निकालपत्रक अकोला लोकसभा मतदार संघाचे निवडणूक अधिकारी व तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. राजेश अग्रवाल यांनी जाहीर केले त्या निकालपत्रकात क्रमांक ८ वर ''वाघ विठ्ठल भिकुजी'' हे नाव नमूद असून त्यांना २६६१ मते मिळाल्याची नोंदसुद्धा त्या निकालपत्रकात आहे. एकूण काय तर महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याच्या उपरोक्त तरतुदीनुसार आपण कायद्यानेच कुलगुरू होण्यास लायक नव्हतो, याची पूर्णपणे जाणीव असतांना संघटनेच्या उमेदवारावर या वैयक्तिक कारणावरून त्यांनी चिखलफेक करणे हे लज्जास्पद असून उपरोक्त तरतुदींची त्यांना माहिती नसेल तर ज्या मोठ्या पदावर आपण जावू इच्छितो त्या पदावर जाण्यासाठीचा किमान अभ्यास करण्याची त्यांच्याजवळ कुवत नसल्याचाच तो पुरावा होतो. कुलगुरू होण्याची कायदेशीर लायकी नसल्याच्या अज्ञानातुन निर्माण झालेल्या वैयक्तिक, क्षुल्लक व काल्पनिक कारणातुन झालेल्या क्षोभापोटी पुढे केलेल्या वर्तनातून संघटनेचे सदस्य म्हणून काम करण्याची सुद्धा आपली लायकी नाही हेच त्यांनी सिद्ध केले आहे.

(२) "भाऊंनी सर्वच राजकीय पक्ष मॅनेज केले आहेत" असा एक आरोप बी.टी.देशमुख यांच्यावर त्यांनी "देशोन्नती"च्या उपरोक्त लेखामध्ये केला आहे. त्यांचा हा आरोप राजकीय पक्षाच्या कामकाजाविषयी संपूर्णपणे अज्ञान व्यक्त करणारा आहे. संघटनेविषयी कृतघ्नपणाने त्यांची विचारसरणी इतकी भरली आहे की, संघटनेने उभा केलेला व निवडून आलेला उमेदवार २४- २४ वर्षे ठामपणाने आपली भूमिका कायम ठेवून वाटचाल करतो व कामाच्या भरवशावर व विचारावरील अविचल निष्ठांमुळे सर्वच पक्षांच्या (ज्यांनी उमेदवारच उभे केले होते ते पक्ष सोडून) प्रेमास व पाठिंब्यास पात्र होतो, याचे मर्म त्यांच्या लक्षातच येवू शकत नाही. ज्यांनी उमेदवार उभे केले त्या व ज्या पक्षांनी उमेदवार उभे केले नाही त्या पक्षांनीसुद्धा विठ्ठल वाघ यांना पायपुसण्याजवळ सुद्धा प्रवेश दिलेला नाही हे त्यांच्या लेखातच त्यांनी मान्य केले आहे. याचे मर्मसुद्धा आपल्या वैयक्तिक गुणवत्तेमध्येच सामावलेले आहे, एवढा जरी विचार त्यांनी केला असता तर संघटनेच्या उमेदवाराला याबावत दुषणे देण्याचे दुषणास्पद वर्तन त्यांच्या हातून घडले नसते. नुटा संघटनेचे जिल्हाध्यक्ष हे विरुद अभिमानाने मिरवित डॉ. वाघ यांनी केलेले उपरोक्त वर्तन अत्यंत हीन बुद्धीच्या प्रदर्शनात मोडणारे असून जिल्ह्याचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेले हे वर्तन अत्यंत अशोभनीय होय.

(३) "वयाची ६२ वर्षे पूर्ण केलेल्या कुणालाही विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणावर काम करता येणार नाही असा विद्यापीठ अनुदान आयोगाचा दंडक आहे. तरीही निवृत्त होणारी माणसे विद्यापीठाच्या प्राधिकरणावर घेण्याचे गैरकामसुद्धा बी.टी.नी केले" असा एक आरोप आपल्या सर्वच पत्रकार परिषदामधून डॉ. विठ्ठल वाघ यांनी केला. असा पोरकटपणाचा आरोप करतांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विनंतीनुसार विद्यापीठ कायद्यात आपोआप बदल होत नाही. कायद्यात बदल होत नाही तोवर ती विनंती बंधनकारक होत नसते ही गोष्ट विठ्ठल वाघ यांना कशी कळली नाही हे आश्चर्यच आहे. शिवाय विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दंडकांची निवडणुकीच्या माध्यमातून अंमलबजावणी करण्याची जबाबदारी अजूनतरी कायद्याने विठ्ठल वाघ यांच्यावर सोपविलेली नाही. "साठ वर्षे हे प्राचार्याचे सेवानिवृत्तीचे वय असेल. मात्र त्यातील लायक वाटलेल्या व्यक्तीला व्यवस्थापन आणखी दोन वर्षासाठी पुनर्नेमणूक देवू शकेल." असा आजही विद्यापीठ अनुदान आयोगाचा दंडक आहे पण हा दंडक नीट वाचल्यास प्रत्येकालाच पुनर्नेमणूक मिळेल असे होत नाही. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४

अन्वये जेथे वय ठरवून दिले असेल तेथे ते पाळावेच लागेल व जेथे ते ठरवून दिलेले नसेल तेथे ते कोणालाही लादता येणार नाही. "What is permitted by Law can not be prohibited by anybody and what is prohibited by Law can not be permitted by any body." एवढी कायद्याची किमान माहिती त्यांना नसावी हे त्यांचे दुर्दैवच होय. वरवर मोजली तरी ६२ वर्षांच्या वर वय असलेली १०० च्या वर माणसे महाराष्ट्रातील निरनिराळ्या विद्यापीठाच्या प्राधिकरणावर कार्यरत आहेत, त्यातील अनेकांची व बी.टी.देशमुख यांची साधी तोंडओळख सुद्धा नाही. असे असतांना वारंवार उपरोक्त आरोप करुन विठ्ठल वाघ यांनी आपल्या अपार अज्ञानाचे प्रदर्शन केले आहे. नुटा संघटनेचे जिल्हाध्यक्ष हे बिरुद अभिमानाने मिरवित डॉ. वाघ यांनी केलेले उपरोक्त वर्तन अत्यंत हीन बुद्धीच्या प्रदर्शनात मोडणारे असून जिल्ह्याचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेले हे वर्तन अत्यंत अशोभनीय होय.

(४) मतभेदांचा आदर व विचारांचे स्वातंत्र्य यांचा संघटनेने सातत्याने व नेहमीच पुरस्कार केलेला आहे. पण याचा अर्थ संघटनेत स्वैराचारी वर्तनाचे अमर्याद थैमान घालण्यास मुभा असा करता येवू शकत नाही. दिनांक २२ नोव्हेंबर २००४ रोजी बुलढाणा येथे निवडणूक प्रचारानिमित्त त्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये "बी.टी. देशमुख सात वर्षात ७४३ प्रकरणात चौकशी समितीचे अध्यक्ष किंवा सदस्य होतात आणि लाखो रुपयांचा भत्ता मिळवितात." असा आरोप करण्यात आला. या पत्रकार परिषदेचा वृत्तांत उपरोक्त मजकूरासह दिनांक २३ नोव्हेंबरच्या 'तरुण भारता'त छापून आला आहे. या वृत्तांतामध्ये या पत्रकारपरिषदेला "नुटाचे अकोला जिल्हाध्यक्ष तथा प्रख्यात वऱ्हाडी कवी प्रा. विठ्ठल वाघ उपस्थित होते." असेही स्पष्टपणे नमूद आहे. उपरोक्त वृत्तांत छापून आल्यानंतर आजपावेतो या पत्रकार परिषदेत असा आरोप करण्यात आलेला नव्हता किंवा असा आरोप करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेला आपण उपस्थित नव्हतो, असा खुलासा डॉ. विठ्ठल वाघ यांनी केलेला नाही किंवा एवढा निर्लज्जपणाचा आरोप खरा असल्याचा कोणताही पुरावासुद्धा त्यांनी दिलेला नाही. 'नुटा बुलेटीन'च्या अंकांचे काळजीपूर्वक वाचन करण्याची सवय जरी त्यांना असती तरी हा आरोप निखालस खोटेपणाचा आहे याबाबतचे अधिकृत पुरावे त्यांना उपलब्ध झाले असते. पण तेवढी सुद्धा तसदी त्यांनी घेतली नाही. नुटा संघटनेचे जिल्हाध्यक्ष हे बिरुद अभिमानाने मिरवित डॉ. वाघ यांनी केलेले उपरोक्त वर्तन अत्यंत हीन बुद्धीच्या प्रदर्शनात मोडणारे असून जिल्ह्याचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेले हे वर्तन अत्यंत अशोभनीय होय.

(५) एका बाजूला नुटा व विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने विधिवतरित्या झालेल्या बैठकीत एकमताने घेतलेल्या निर्णयाला (ज्या निर्णयाला अनेक समविचारी संघटनांनी एकमताने पाठींबा दिला होता) विरोध करायचा, मात्र असे करतांना आपण ज्या अकोला जिल्हा युनिटचे अध्यक्ष आहोत त्या जिल्ह्याच्या कार्यकारी मंडळाची किंवा जिल्हासभेची बैठक बोलावण्याची तसदीसुद्धा त्यांनी घेऊ नये ही गोष्ट संघटनेच्या केंद्रीय कार्यकारी मंडळाला व जिल्ह्याच्या कार्यकारी मंडळाला कस्पटासमान लेखण्याच्या त्यांच्या वृत्तीचे प्रतिनिधित्व करणारी आहे.

(६) सन २००१ ते २००४ या चार वर्षांच्या काळात ते नुटाच्या कार्यकारी मंडळाच्या एकाही बैठकीला हजर राहीले नाहीत. असे बेजबाबदार वर्तन करण्यापूर्वी त्यांनी आपल्या पदाचा राजीनामाही दिला नाही. सतत तीन वेळा गैरहजर राहिल्याबद्दल त्यांचे सदस्यत्व रद्द करण्याचा घटनेने असलेला अधिकार सौजन्य म्हणून नुटाच्या कार्यकारी मंडळाने वापरला नाही, याचा त्यांनी मनसोक्त गैरफायदा घेतला व आपल्या जिल्हाध्यक्ष पदाचा गैरवापर केला.

(७) स्वतः आमसभेचे सदस्य व कार्यकारी मंडळाचे सदस्य म्हणून असलेल्या अधिकारांचा वापर करावयाचा नाही, ठराव किंवा प्रस्ताव मांडायचा नाही, मांडलेल्या प्रस्तावाला विरोध करण्यासाठी किंवा पाठींबा देण्यासाठी आमसभेला किंवा कार्यकारी मंडळाच्या बैठकीला उपस्थित रहावयाचे नाही, नंतर मात्र एकमताने संमत केलेल्या ठरावावर वृत्तपत्रातून क्षुद्रबुद्धिची टीका टिप्पणी करावयाची हे सदस्य व अध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेले अत्यंत बेजबाबदारीचे स्वैराचारी वर्तन होय.

(८) स्वतःला पसंत नसलेला एखादा प्रस्ताव परतवून लावण्यासाठी किंवा निरस्त करण्यासाठी संघटनेचा सदस्य तसेच कार्यकारी मंडळाचा सदस्य या नात्याने उपलब्ध असलेल्या कोणत्याही संधीचा वापर न करता किंवा कार्यकारी मंडळाला किंवा आमसभेला आपल्या विचारांचा आदर करण्याची किंवा मूल्यमापन करण्याची कोणतीही संधी न देता त्यांनी केलेले लिखाण संघटनेचा सदस्य म्हणवून घेतांना करण्यात आलेल्या लज्जास्पद वर्तनाच्या श्रेणीमध्येच मोडणारे आहे.

(९) अनेक महिने सातत्याने कार्यकारी मंडळाच्या व आमसभेच्या बैठकीला अनुपस्थित राहणे, संघटनेच्या जिल्हा युनिटचे अध्यक्ष हे बिरुद मिरवित संघटनेने एकमताने घेतलेल्या निर्णयाला वैयक्तिक, क्षुल्लक व काल्पनिक कारणावरुन विरोध करणे, अशा विरोधासाठी घेतलेल्या पत्रपरिषदेत कोणताही पुरावा न देता बिनबुडाचे आरोप करणे, त्यांच्या या व यासारख्या उपरोक्त कृत्यांचा या सभागृहाला विषाद वाटतो. एक जिल्हाध्यक्ष या नात्याने हे जे अत्यंत अशोभनीय व संघटनेचा सदस्य या नात्याने जे लज्जास्पद वर्तन त्यांनी केले आहे त्याचा हे सभागृह तीव्र निषेध करीत आहे व त्यांच्या असद्‌वर्तनीय वागणुकीमुळे त्यांचे संघटनेचे सदस्यत्व पाच वर्षांसाठी निलंबित करण्याचा निर्णय घेत आहे.

***नोट :-*** *सदरहू प्रस्तावावर निर्णय घेण्यापूर्वी डॉ.विठ्ठल वाघ यांना, त्यांनी इच्छा व्यक्त केल्यास, मुद्देनिहाय त्यांची बाजू मांडण्याची परवानगी देण्यात येईल व त्यानंतर आमसभेचा निर्णय होईल.*

## विषय क्रमांक ३७२ :
## *१.१.१९९६ नंतर अनुदानावर आलेल्या महाविद्यालयातील शिक्षकांची थकबाकी*

प्रा.व्ही.एस.भोयर हे पुढील प्रस्ताव मांडतील :-

दिनांक १.१.१९९६ पासुन सर्व महाविद्यालयीन शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन श्रेणी लागु झाली आहे व त्याप्रमाणे थकबाकी (Arears) देण्यात आली आहे. परंतु जी महाविद्यालये १.१.१९९६ नंतर टप्प्याटप्प्याने २५,५०,७५, १०० टक्के अनुदानावर आली आहेत अशा महाविद्यालयातील शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाची थकबाकी (Arears) देण्यात आलेली नाही. एवढेच नाही तर यासंबधी महाविद्यालयाने सादर केलेले प्रस्ताव देखील नागपूर विभागाच्या सहसंचालकांच्या कार्यालयाने स्विकारले नाहीत. म्हणून ही सभा असे ठरविते की, "दि. १.१.१९९६ नंतर जी महाविद्यालये टप्प्याटप्प्याने २५, ५०, ७५, १०० टक्के अनुदानावर आली आहेत त्या सर्व महाविद्यालयातील शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे निघणारी थकबाकी (Arears) देण्यात यावी"

******

### TREASURER'S EXPLANATORY NOTE
**GIVING DETAILS OF EXPENDITURE ON ESTABLISHMENT EXPENSES FOR THE YEAR ENDED ON 31ST MARCH 2004**

In the Income and Expenditure Account of the Audit Report for the year ended on 31st March 2004 an amount of Rs.1,16,827.00 is shown as expenditure towards **establishment expenses**. The General Body meeting of NUTA dated 15.4.79 while discussing the audit report for the year ending on 31st March 1978 had resolved (vide item no.(3) (c) on page no. 109 of 1979 **NUTA Bulletin**,) that "the treasurer will circulate a brief explanatory note regarding income and expenditure giving details of expenditure as far as possible along with financial statements hereinafter". Hence the details of the break up of establishment expenses are given here.

**ESTABLISHMENT EXPENSES FOR THE YEAR ENDED ON 31ST MARCH 2004**

| Particulars | Amount Rs.P. |
|---|---|
| Travelling Expenses | 24,839.00 |
| Printing and Stationery | 35,205.50 |
| Telephone & Trunk Call | 10,526.00 |
| Repairs & Maintenance | 8,745.00 |
| Meeting Expenses | 70.00 |
| Bank Commission | 5,458.50 |
| Postage | 3,353.00 |
| Affiliation Fees | 11,000.00 |
| Loss on Sale of Investment | ..... |
| Miscellenous Expenses | 6,830.00 |
| Legal Expenses | ..... |
| Clerks/Peon's Salary | 10,800.00 |
| Total | **1,16,827.00** |

9th June 2004

Sd. **S. A. Tiwari**
Treasurer, NUTA

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS**

( University Club House, B Road, Churchgate, Bombay-400 020. )

# सन १९९१ ते सन १९९९ या काळातील नेटसेटग्रस्तांची प्रकरणे व्यक्तिशः छाननीसाठी घेण्याचा विद्यापीठ अनुदान आयोगाचा निषेधार्ह निर्णय

**रविवार, दिनांक ९ जानेवारी २००५ रोजी मुंबई येथे झालेल्या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत संमत करण्यात आलेला ठराव**

सन १९९१ पासून तर सन १९९९ पावेतोच्या काळात महाराष्ट्रामध्ये विधिवतरित्या नेमण्यात आलेल्या, मान्यताप्राप्त व नियमित सेवेत असलेल्या नेटसेट ग्रस्त शिक्षकांच्या संदर्भात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने दिनांक ३० मार्च २००३ रोजी "MEMORANDUM TO THE UGC on appointment of teachers in the Universities and Colleges in Maharashtra and the NET/SET qualification condition" या विषयावर एक निवेदन पाठवून (यापूढे उल्लेख संघटनेचे निवेदन) या शिक्षकांना नेटसेटची अट लागू होत नाही ही गोष्ट स्पष्टपणे लक्षात आणून दिली होती.

२) महाराष्ट्रामध्ये विद्यापीठ कायद्याने पात्रता ठरविण्याचे विधिमय माध्यम काय आहे ही गोष्ट विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून देण्यात आली होती. याबाबतचा संघटनेच्या निवेदनातील परिच्छेद २ पुढील प्रमाणे :-

"2. LAWFUL INSTRUMENT FOR PRESCRIBING QUALIFICATIONS :

2.1 The Non-Agricultural Universities in Maharashtra, viz, University of Mumbai, SNDT Women's University, University of Pune, Nagpur University, Amravati University, Shivaji University, North Maharashtra University, Dr. Babasaheb Marathwada University and Ramanand Tirth University are governed by the provisions of the Maharashtra Universities Act, 1994. **Section 51(8) of the said Act provides that Recruitment and Qualifications of the teachers of the Universities and the affiliated colleges is to be regulated by Statutes to be made by the Universities.** In case Statutes do not exist or where Statutes exist but they need to be amended, and if in the opinion of the Universities it is likely to take time before new Statutes could be brought into existence or existing Statutes could be amended, Section 14(8) of the Act provides **the Vice Chancellors with powers to issue directions.**

2.2 Section 8(3) of the said Act empowers the State Government to issue **Standard Cod**e for the purpose of securing and maintaining uniform standards by Notification in the official Gazette.

2.3 It may be pointed out that the UGC is fully aware of such provisions in the Universities Act in different States in the country and therefore in all the Regulations/ Notifications that the UGC has been issuing from time to time, the UGC has been emphasizing that it would be necessary for the Universities to make Statutes to implement the UGC Notifications/Regulations."

३) महाराष्ट्रामध्ये शासनाने नेटसेटची पात्रता परीक्षा विधिमय माध्यमाच्याद्वारे कधीच सक्तीची केली नाही ही गोष्ट विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून देण्यात आली होती. याबाबतचा संघटनेच्या निवेदनातील परिच्छेद ३ पुढील प्रमाणे :-

"3.5 Thus, it is clear that instead of firmly introducing NET/SET as compulsory entry point qualification condition for recruitment of candidates through the competent legal instruments such as the Standard Code, the **State Government took resort to informal instruments paying lip sympathy to the UGC directions.**

3.6 In Maharashtra, NET/SET qualification, though stated from time to time by the Government, **was never brought into existence as entry point qualification condition by the lawful machinery,** viz,. the Statutes or Directions by the Vice Chancellor of the Universities or the Standard Code by the State Government."

४) जुन्या पात्रतेच्या जागी नेटसेटचा समावेश असलेली नवीन पात्रता महाराष्ट्रामध्ये लागू होण्याची "कट ऑफ डेट" कोणती? ही गोष्ट विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून देण्यात आली होती. याबाबतचा संघटनेच्या निवेदनातील परिच्छेद ५.२ पुढील प्रमाणे :-

"5.2 With reference to old qualification, new qualification and the **cut off date,** it is necessary to point out that old arrangement for recruitment in the teaching cadre consists of -

(i) qualifications prescribed by clause 8 in the GR dated 27th February 1989 (page 17 of the booklet) which had become Statute and which reads as "Generally the minimum qualifications for appointment to the post of Lecturer in the scale of pay of Rs. 2200-4000 shall be a master's degree in the relevant subject with at least 55% of marks, or its equivalent grade and good academic record"; and

(ii) selection committees prescribed in clause 9 of the same Statute which reads as "the Selection Committee has already been laid down in the Appendix accompanying Government Resolution, Education and Youth Services Department No. USG.1177/129387/XXXII (Cell), dated 25th October 1977". This also was converted into Statute in all the Universities in the State.

**This arrangement was continued to be in operation till it was replaced by the new arrangement which came into existence by issuance of directions by the Vice Chancellors. For instance, in Amravati University it was done by Direction No. 7 of 1999 dated 30th December 1999 and in other Universities in the State also around the same date.** These prescribed the new qualifications making the NET/SET compulsory at the recruitment level

and composition of selection committees for recruitment in the teaching cadre. These directions in some of the Universities have been converted into Statutes and in some others they are in the process of being done. Thus it is crystal clear that the lawful cut off date for demarking old arrangement and new arrangement is 30th December 1999 or a few days prior to that or a few days thereafter. According to the Hon'ble Supreme Court of India decision, NET/SET would not be applicable to them."

५) नेट सेट ची पात्रता पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येत नाही असा स्पष्ट निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे ही गोष्ट विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून देण्यात आली होती. याबाबतचा संघटनेच्या निवेदनातील परिच्छेद ४.१ पुढील प्रमाणे :-

"4.1 In the University of Delhi V/s Raj Singh and Others, the Hon'ble Supreme Court (AIR 1995, SC, 336) while dealing with the UGC Notification dated 19th September 1991 ruled that **(i) Regulations are valid; (ii) They are recommendatory in character; and (iii) the application of the provisions was prospective.**"

६) या सर्व शिक्षकांच्या नेमणुका संपूर्णपणे कायदेशीर होत्या ही गोष्ट विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून देण्यात आली होती. याबाबतचा संघटनेच्या निवेदनातील परिच्छेद ३.१० पुढील प्रमाणे :-

"3.10 All the Lecturers, barring a few, appointed during this entire period were through duly constituted Selection Committees as per the UGC requirements. By not introducing NET/SET as entry point qualification condition, as already pointed out hereinbefore, several hundreds of Lecturers were recruited with PG qualifications with B+ (55% or more) and good academic record through properly constituted selection committes but without NET/SET. **This process went on from 19th September 1991 almost till 30th December 1999** (in Amravati University area) and almost till that date in other University areas. All these appointments were also after the posts in which they were selected being advertised as per the requirements of law. All such appointments were approved by the Universities concerned and their posts were covered by 100 per cent salary grant-in-aid by the State Government. These Lecturers continue to hold their posts and continue to be paid salaries and covered by the salary grants-in-aid including payment of arrears on account of the revision of pay scales under the Fifth Pay Commission. In fact, the State Government in its GR dated 18th October 2001 has placed on record that more than 6000 Lecturers fall under this category."

७) या सर्व शिक्षकांना (किंवा त्यापैकी कोणालाही) सेवामुक्त करणे बेकायदेशीर आहे ही गोष्ट विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून देण्यात आली होती. याबाबतचा संघटनेच्या निवेदनातील परिच्छेद ४.५ पुढील प्रमाणे :-

"4.5 **The services of such teachers could not be terminated for the reasons that**

a) They were selected by duly constituted selection committee;

b) As candidates, they possessed the then requisite minimum qualification prescribed under the Statute;

c) All these cases fell under Second Proviso to Clause 2 of the UGC Regulation, 2000;

d) The decision of the Hon'ble Supreme Court in University of Delhi V/s. Raj Singh & Others applied to them;

e) The UGC Regulations applied only to candidates who wanted to become Lecturers and not to the Lecturers who were already appointed;

f) The second Proviso to Clause 2 was only to be prospective in operation and not retrospective;

g) After the Government and the Universities prescribed NET/SET as minimum entry point conditions for Lecturers with a clear direction that no non NET/SET candidate should be appointed as Lecturers, the Universities did not appoint any such candidates as Lecturers and when the colleges appointed such candidates, the Universities have rejected approval of such appointments."

८) विद्यापीठ अनुदान आयोगाला तपशीलवार निवेदन सादर केल्यानंतर आयोगाने संघटनेचे म्हणणे ऐकून घ्यावे अशी विनंती संघटनेतर्फे आपल्या निवेदनाच्या परिच्छेद ५.४ मध्ये पुढील शब्दात करण्यात आली होती. :-

"5.4 In view of the foregoing, the MFUCTO requests that the UGC

(a) **Immediately issue direction to all Non Agricultural Universities in Maharashtra that in respect of Lecturers appointed prior to the cut off date, viz. 30th December 1999, NET/SET qualification condition is not applicable; and**

(b) Consider the cases of all those Lecturers who have been appointed after the cut off date without NET/SET for the purpose of considering eligibility for relaxation from the NET/SET qualification as per the First Proviso to qualifications contained in the UGC Regulation called the UGC (Minimum Qualifications required for the appointment and Career Advancement of teachers in Universities and institutions affiliated to it Regulation 2000) dated 4th April 2000.

5.5 Along with this Memorandum, Several important documents are enclosed including a booklet containing all the various Notifications/Regulations/Rules issued by the UGC and the Government of Maharashtra in relation to the NET/SET.

5.4 The MFUCTO desires that the UGC provide an opportunity to the MFUCTO to explain in person the various aspects of this human problem in the form of improper treatment of NET/SET qualification conditions in the State of Maharashtra. The **MFUCTO deputation would wait on the Chairman of the UGC on any appointed day and time at New Delhi** so that the complicated issues involved in this vexed problem will stand settled once and for all and injustice would stand removed. It is towards this end that the MFUCTO is submitting this Memorandum **and is seeking immediate appointment for discussion.**"

